आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस; नंदुरबार, नाशिक, बीडसह अनेक भागातली पीकं संकटात

- राज्यभरातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटण बसवले जाणार

- बीड इथं आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचा समारोप, साडेचार लाखाहून अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

- शेअर बाजारात तेजी / राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी पुन्हा २५ हजाराच्या वर / सेन्सेक्समधे ६१२ अंकांची वाढ

**आणि**

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार वसंतराव चव्हाण यांचं निधन

**<><><><><><>**

राज्यात आजही विविध जिल्ह्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या शहादा शहरात मुसळधार पाऊस झाला असून सुसरी धरणातून गोमाई नदीत विसर्ग सुरु आहे. गेल्या तीन दिवसांपासून जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक तालुक्यातल्या शेतांमध्ये पाणी शिरलं असून तीन जण वाहून गेले आहेत. यात अक्कलकुवा तालुक्यातल्या दोन, तर अक्राणी तालुक्यातल्या एकाचा समावेश आहे. पावसामुळे जिल्ह्यातल्या ४२ घरांची पडझड झाली आहे. पावसामुळे जिल्ह्यातल्या केळी, पपई आणि कापसाच्या पिकाला धोका निर्माण झाला आहे.

**नाशिक** जिल्ह्यातल्या सुरगाणा, पेठ, त्र्यंबक या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून ग्रामीण भागात अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. तसंच अनेक तालुक्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यातल्या दहा धरणांमधून विसर्ग सुरू आहे.

**बीड** जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाचं प्रमाण प्रचंड वाढलेलं असल्यानं शेतीचं नुकसान झालं आहे. पावसाने रस्तेही पाण्याखाली गेल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. आष्टी तालुक्यात सततच्या पावसामुळे उडीद, कापूस, सोयाबीन, मूग, बाजरी, तूर, कांदा आदी पिकं सडून गेली आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या अक्कलपाडा धरणातून आज पुन्हा विसर्ग वाढवण्यात आला. त्यामुळे पांझरा नदीची पाणीपातळी आणखी वाढल्यानं नदीवरचे तीन पूल वाहतुकीसाठी बंद केले आहेत. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धुळे शहरातल्या मोती नाला, सुशी नाला यांची पाणी पातळी वाढून घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या नाल्यांकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर असल्यानं सर्वच धरणातल्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे वाई इथल्या धोम आणि बलकवडी धरणातून कृष्णा नदीत विसर्ग सुरु आहे. मोरणा गुरेघर धरणातून आज दुपारी चार वाजता मोरणा नदीत पाणी सोडलं जाईल. तसंच, कण्हेर धरणातून वेण्णा नदीत पाणी सोडलं जाईल.

**रत्नागिरी** जिल्ह्यातल्या राजापूरला कोल्हापूरशी जोडणाऱ्या अणुस्कुरा घाटात शनिवारी पहाटे कोसळलेली दरड हटवण्याचं काम आज पूर्ण झालं. दुपारनंतर या घाटातून एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली. लवकरच दुहेरी वाहतूक सुरू होण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

राज्यभरातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटणं बसवण्याचा उपक्रम राबवला जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज मुंबईत बातमीदारांना ही माहिती दिली. शाळांमध्ये तक्रारपेट्या बसवण्याचं काम तातडीनं पूर्ण करणार असून पोलिसांच्या उपस्थितीत या पेट्या उघडण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं काल घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीची रवानगी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथल्या राज्यस्तरीय कृषीमहोत्सवाचा आज समारोप झाला. २१ ऑगस्टला सुरु झालेल्या राज्यस्तरीय कृषीप्रदर्शनाला मागील सहा दिवसात सुमारे साडेचार लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी भेट दिली. या महोत्सवात अत्याधुनिक कृषी अवजारांचे प्रदर्शन, धान्य महोत्सव, स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या वस्तूंचे प्रदर्शन आणि थेट विक्री अशा अनेक उपक्रमांचं आयोजन केलं होतं. या ठिकाणी असणाऱ्या विविध प्रकारच्या ४३५ स्टॉल्समधून सुमारे तीन कोटींपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती बीड जिल्हा कृषी अधीक्षकांनी दिली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. आज त्यांनी विधानभवनात निवडणूक अधिकाऱ्यांकडून निवडीबाबतचं पत्र स्वीकारलं. बिनविरोध निवड झाल्याबद्दल पक्षाचे कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचं अभिनंदन केलं. यावेळी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीनं उद्या पुकारलेला एकदिवसीय बंद मागे घेण्यात आला आहे. मुंबई सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली व्यापारी प्रतिनिधींची बैठक झाली. व्यापाऱ्यांच्या समस्यांबाबत एक उच्चस्तरीय समिती स्थापन करून एका महिन्यात या समितीचा अहवाल घेण्याच्या आश्वासनानंतर हा बंद मागे घेण्याचा निर्णय समितीनं घेतला.

**<><><><><>**

श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी आज देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी होत आहे. मथुरेसह देशभरातल्या सर्वच मंदिरांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत. राज्यातल्या विविध मंदिरांमध्ये विशेष पूजा अर्चा आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. श्रीकृष्णाची मुर्ती, पाळण्यात बसवून हा सोहळा साजरा करण्याची प्रथा असून उद्या मुंबईसह विविध ठिकाणी गोविंदा पथके गल्लोगल्ली उभारलेल्या दहीहंड्या फोडण्यासाठी बाहेर पडतील. जन्माष्टमीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारांमध्ये आज तेजी पाहायला मिळाली. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनं २५ हजाराचा टप्पा पुन्हा ओलांडला. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ६१२ अंकांची वाढ झाली आणि तो ८१ हजार ६९८ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी १८७ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ११ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैद्राबादमधल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर आज पहाटे त्यांची

प्राणज्योत मालवली. उद्या सकाळी अकरा वाजता नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सरपंच, विधानपरिषद, विधानसभेचे सदस्य ते लोकसभेचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. याशिवाय शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चव्हाण यांना श्रद्धांजली वाहिली. चव्हाण यांच्या निधनामुळे लोकांच्या आशा आकांक्षांशी समरस झालेलं लोकाभिमुख नेतृत्व हरपलं अशी भावना त्यांनी व्यक्त केली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही चव्हाण यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे काँग्रेसने लढवय्या कार्यकर्ता आणि लोकप्रतिनिधी गमावला असं खरगे यांनी व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनीही वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

**<><><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण राजकोट इथं बसवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा आज मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे कोसळला. आठ महिन्यांपूर्वी नौदल दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचं अनावरण झालं होतं. पुतळा कोसळल्यानं शिवप्रेमी संतप्त झाले असून त्यांनी शांतता आणि संयम बाळगावा, असं आवाहन आमदार वैभव नाईक यांनी केलं आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पुतळ्याच्या परिसरात पोलीस तैनात केले आहेत.

**<><><><><><>**

वर्षातली शेवटची टेनिस ग्रँडस्लॅम यूएस खुली अजिंक्यपद स्पर्धा आजपासून न्यूयॉर्कमध्ये सुरू होणार आहे. भारताचा सुमित नागल आणि रोहन बोपण्णा हे दोघे स्पर्धेत उतरतील. एकाच वर्षात चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या एकेरीत खेळणारा सुमीत

नागल २०१९ नंतरचा पहिला भारतीय पुरुष टेनिसपटू ठरला आहे. याशिवाय, पुरुष एकेरीत गतविजेता नोव्हाक जोकोविच, फ्रेंच आणि विम्बल्डन अजिंक्यपद विजेता कार्लोस अल्काराज, तसंच अग्रमानांकित यानिक सिनर यांच्यावर टेनिसपटूंचं लक्ष असेल. तर महिला एकेरीत गतविजेती कोको गॉफ, माजी विजेती इगा श्वियांतेक, एलेना रिबाकीना आणि अरीना साबालेंका या चौघी जेतेपदाच्या प्रबळ दावेदार असतील.

**<><><><><>**

आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी, आणि विशेषतः आर्थिक विकासासाठी प्रयत्न करावेत, असं प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. आदिवासी जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर आदर्श आदिवासी गाव बनवणं आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणं, या विषयाबाबत आज मुंबईत राजभवनात राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. 'प्रधानमंत्री जनमन योजने'च्या राज्यातल्या अंमलबजावणीचा आढावाही त्यांनी घेतला.

आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचा विकास साधण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन विविध योजना राबवतं. त्यांचा लाभ आदिवासींमधल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा यादृष्टीनं त्यांना ओळख दर्शविणारी कागदपत्रं वितरित करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी विदर्भात अनेक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात, कोकणात किनारपट्टीवर वारे वाहण्याची तसंच तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**